# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### सोलापूर जिल्ह्यातील टेंभू उपसा सिंचना अंतर्गत असलेले वीज देयक थकीत असल्याबाबत

**(१) ४५७७० (०९-१०-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, सांगली जिल्ह्यातील आटपाटी, कवठेमहांकाळ या दुष्काळी तालुक्याला वरदायी ठरलेली टेंभू उपसा सिंचन योजना थकबाकीच्या विळख्यात असल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२०-२१ या सालामध्ये कृष्णा नदीला पूर आला तेव्हा हे पुराचे पाणी टेंभू उपसा सिंचन योजने मधून आटपाडी, कवठेमहांकाळ, सांगोला या अवर्षणप्रवण (दुष्काळी) भागामध्ये सोडण्यात आल्याने काही प्रमाणात पुरावर नियंत्रण करता आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आकारण्यात आलेल्या पाणीपट्टीपैकी वीज बिलाचा खर्च शासनाने टंचाई निधीतून भरण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वीज बिलाचा खर्च शासनाने टंचाई निधीतून भरावा व निव्वळ पाणीपट्टी शेतकऱ्यांकडून आकारण्यात यावी अशी मागणी शेतकर्‍यांकडून होत आहे, हे ही खरे काय,

(५) असल्यास,सदर मागणीप्रमाणे निव्वळ पाणीपट्टी शेतकऱ्यांना आकारण्यात यावी आणि म्हैसाळ टेंभू या योजनेतील शेतकऱ्यांना कोरडा माण नदीच्या माध्यमातून दर तीन महिन्यांनी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्‌अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

सन २०२०-२१ मध्ये कृष्णा नदीला आलेल्या पूर परिस्थितीच्यावेळी १.२८५ अ.घ.फू. (टी.एम.सी.) पाणी उचलण्यात येऊन आटपाडी, कवठेमहांकाळ, सांगोला या दुष्काळी (अवर्षणप्रवण) तालुक्यामधील ल.पा. तलाव, को. प. बंधाऱ्यामध्ये सोडण्यात आल्यामुळे काही प्रमाणात पुरावर नियंत्रण करता आले आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०२०-२१ साठी कोणतीही टंचाई सदृश्य परिस्थिती नसल्याने शासनाने टंचाई निधीमधून वीज बिलाचा खर्च भरलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) हे अंशत: खरे आहे.

टेंभू म्हैसाळ योजनेतून माण व कोरडा नदीमध्ये पाणी सोडणेबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे.

(६) सांगोला तालुक्यातील कोरडा व माण नदीवरील बंधाऱ्यांमध्ये पाणी सोडण्याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार ( जि. बुलढाणा ) तालुक्यात मंजूर करण्यात आलेले २२० के.व्ही. क्षमतेचे मेगा विदयुत सबस्टेशनचे काम तात्काळ सुरु करण्याबाबत**

**(२) ४६०५९ (१४-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार ( जि. बुलढाणा ) तालुक्यात मंजूर करण्यात आलेले २२० के.व्ही. क्षमतेचे मेगा विदयुत सबस्टेशनचे काम तात्काळ सुरु करण्याची मागणी ऊर्जा मंत्री यांच्याकडे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिकांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१), (२) व (३) २२० के.व्ही. लोणार उपकेंद्राच्या उभारणीस महापारेषण कंपनीच्या संचालक मंडळाच्या दि. १७.१०.२०२२ च्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेचा विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) वीज नियामक आयोगाकडे तत्वत: मान्यतेसाठी पाठविण्याचे प्रस्तावित आहे. वीज नियामक आयोगाची तत्वत: मान्यता मिळाल्यानंतर व आर्थिक सहाय्य (Financial Assistance) बाबतची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर उपकेंद्र व वाहिनी उभारणीसाठीची निविदा प्रक्रिया करणे नियोजित आहे.

---

**मौजे पुरनाड (ता.मुक्ताईनगर) येथील चौकातील नोंदणीकृत क्लबच्या नावाखाली अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत**

**(३) ४६०८२ (३१-१०-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पुरनाड (ता.मुक्ताईनगर) येथील चौकातील नोंदणीकृत क्लबच्या नावाने सुरु असलेल्या जुगारी क्लबवर तत्काळ कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांच्याकडे दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३)

सदर निवेदनाच्या अनुषंगाने व गोपनीय माहितीच्या आधारे हॉटेल रावसाहेब येथील उसामा जिमखाना स्पोर्टस क्लबवर छापा टाकून जुगार खेळणाऱ्या १४ इसमांना रुपये १,७०,०००/- इतक्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर १४ इसमांविरुध्द सीसीटीएनएस नं. २०१/२०२२ मुंबई जुगार कायदा कलम ४/५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर १४ आरोपी यांना अटक करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**राज्यातील शिक्षक पात्रता परिक्षा गैरव्यवहार (टीईटी) या प्रकरणाची**
**तक्रार सायबर गुन्हे शाखेकडे नोंदविण्यात आल्याबाबत**

**(४) ४६३८२ (३१-१०-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक पात्रता परिक्षा गैरव्यवहार (टीईटी) या प्रकरणाची तक्रार माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार सायबर गुन्हे शाखेकडे नोंदविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीतांविरुद्ध कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२३) :**(१) व (२) होय

राज्यातील शिक्षक पात्रता परिक्षा गैरव्यवहार (टीईटी) प्रकरणी सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे माहे डिसेंबर २०२१ मध्ये गु.र.नं ५६/२०२१ व ५८/२०२१ भादवि कलम ४०९, ४०६, ४२०, ४६५, ४६७, ४६८,१२० (ब) २०१, ३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (डी) सह महाराष्ट्र विद्यापीठाच्या मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परिक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम (१९९० सुधारीत) कलम ७, ८ याप्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

दोन्ही प्रकरणामध्ये सायबर पोलीस स्टेशन, पुणे शहर मार्फत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील मंत्रालयासह विविध शासकिय कार्यालयातील अनेक कामे**
**बाहययंत्रणेमार्फत (आऊट सोर्सिंग ) करुन घेण्याचा निर्णय**

**(५) ४६४०३ (२५-०९-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालयासह विविध शासकिय कार्यालयातील अनेक कामे बाहययंत्रणेमार्फत (आऊट सोर्सिंग ) करुन घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णय घेण्याची कारणे काय आहेत व सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे व त्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१२-२०२२) :** (१) , (२) व (३) होय. प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवून विकास कामांसाठी अधिक निधी उपलब्ध व्हावा यादृष्टीने शक्य असेल तेथे नवीन पदनिर्मिती न करता सदर कामे बाह्ययंत्रणेकडून (outsourcing द्वारे) करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यासंदर्भातील आदेश वित्त विभाग शासन निर्णय दि.२७.४.२०२२ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक मध्ये गेल्या काही दिवसांपासून गुंडानी हैरान केले असून एकावर प्राणघातक हल्ला केल्याबाबत

**(६) ४६५०३ (२७-१०-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक मध्ये काही दिवसांपासून गुंडागिरी वाढली असून दररोज एका व्यक्तीवर प्राणघातक हल्ला केल्याची नोंद स्थानिक पोलिस स्थानकांमध्ये माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नाशिकमध्ये घरफोडया, गुंडगिरीच्या घटनांमध्येही वाढ झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नाशिक शहरातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती सुयोग्य राखण्याकरिता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.

नाशिक पोलीस आयुक्तालयाअंतर्गत म्हसरुळ पोलीस ठाणे येथे एप्रिल २०२२ दरम्यान प्राणघातक हल्याचा असा एकच गुन्हा घडला असून सदर गुन्ह्यातील एकूण ०८ आरोपींविरुध्द गु.र.नं.६३/२०२२, भारतीय दंड संहिता कलम ३०७, ३२६, ३२४, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ५०४, ५०६ सह, शस्त्र अधिनियम, १९५९, कलम ४/२५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सन २०२२ मध्ये ऑक्टोबर अखेर घरफोडीच्या दाखल गुन्ह्यामध्ये मागील वर्षीच्या तुलनेत वाढ झाली असून गुंडगिरीच्या दाखल गुन्ह्यात घट झाली आहे.

(३) नाशिक शहरातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती सुयोग्य राखण्याकरिता संवेदनशील ठिकाणी नाकाबंदी करण्यात येऊन रात्रीच्या गस्ती दरम्यान गुन्हेगारांची तपासणी करण्यात येते. तसेच आवश्यकतेनुसार कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात येतात.

आयुक्तालय हद्दीमध्ये प्रतिबंधात्मक कारवाई, शांतता समिती तसेच मोहल्ला कमिटी बैठक, कॉर्नर मिटींगद्वारे जनजागृती, निर्भया पथक इ. उपाययोजना केल्या जात आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## वैतरणा धरण क्षेत्रातील अतिरिक्त जमिनी मूळ धरणग्रस्त मालकांना परत देण्याबाबत

**(७) ४६५०६ (०९-१०-२०२२). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा धरण क्षेत्रातील अतिरिक्त जमिनी मूळ धरणग्रस्त मालकांना परत देण्यासंदर्भात मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले व घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, अतिरिक्त जमिनी मुळ धरणग्रस्त मालकांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

वैतरणा धरण क्षेत्रातील अतिरिक्त जमिनी मूळ धरणग्रस्त मालकांना परत देण्यासंदर्भात मा. मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७.०६.२०२२ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बैठक घेण्यात आली. तथापि, तद्नंतर तत्कालीन मंत्रीमंडळ अस्तित्वात राहिले नसल्याने सदरहू बैठकीचे अद्याप इतिवृत्त अंतिम झालेले नाही.

(२) सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार वैतरणा धरण क्षेत्रातील अतिरिक्त जमिनी जाहीर लिलावाद्वारेच देणे शक्य आहे. अतिरिक्त जमिनीचा लिलाव करणेकरिता जमिनीच्या सर्व्हे नंबरचे गट नंबरमध्ये रुपांतरित करणे क्रमप्राप्त आहे. तथापि, सदर प्रक्रिया गुंतागुंतीची असून त्यास अधिक कालावधी लागू शकतो. याकारणाने सद्यस्थितीत ७/१२ वरील सर्व्हे नंबर

नुसारच लिलाव करणे शक्य आहे किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याचे निर्देश मा. मंत्री यांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिले.

त्यानुसार अतिरिक्त जमीन असलेल्या गावापैकी कोणत्याही एका गावातील जमिनीचा लिलाव सर्वप्रथम करण्याबाबत निर्देश देण्यात आले व त्यानुसार उर्वरित गावांतील जमिनीबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आलेले आहे.

(३) बैठकीत दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी नाशिक, यांनी दि.०८/०६/२०२२ रोजी क्षेत्रीय स्थळी भेटदिली असून भेटीदरम्यान अतिरिक्त जमिनीचा ७/१२ वरील सर्व्हे नंबर नुसार जाहीर लिलाव करण्यास संबंधीत शेतकऱ्यांनी सहमती दर्शविली.

यासाठी आवश्यक अतिरिक्त जमिनीची मोजणी करण्याची प्रकिया सुरु करण्यात आलेली आहे. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिलेल्या निर्देशानुसार उप अधीक्षक, भूमी अभिलेख, इगतपुरी यांच्याशी समन्वय साधून अतिरिक्त जमिनीच्या सर्व्हे नंबरचे नकाशे तयार करून घेण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर नकाशे तयार झाल्यानंतर सदर अतिरिक्त जमिनीचा जाहीर लिलाव करणे करिताचा सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे लवकरात लवकर सादर करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिखली (जि.बुलढाणा) येथील लघु मध्यम प्रकल्पांच्या कालवा व द्वार दुरुस्तीसह इतर कामे करणेबाबत

**(८) ४६५३२ (०९-१०-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली (जि.बुलढाणा) मतदार क्षेत्रातील मॅडगाव लघुपाटबंधारे, कव्हळा लघुपाटबंधारे, मिसाळवाडी लघुपाटबंधारे, अंचरवाडी १ व २ हिवरखेड १ व २, पाटोदा, तेल्हारा, हराळखेड, ब्राम्हणवाडा, मासरूळ, शेकापूर लघुपाटबंधारे, पांग्रीकेसापूर लघुपाटबंधारे, झरी लघुपाटबंधारे, दहीद लघुपाटबंधारे, बोधेगाव लघुपाटबंधारे, मातला या प्रकल्पांचे कालवे व द्वार दुरुस्तीसह इतर कामे लपा प्रकल्पांची व्दार दुरुस्तीची कामे सन २०२०-२१ च्या प्रापणसुचीत अंतर्भुत आहे तसेच सदरील कामे माहे मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे माहे मार्च, २०२१ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत काय तसेच कोण कोणती कामे पूर्ण करण्यात आली व कामे अपूर्ण असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, अपूर्ण राहिलेल्या कामाबाबत शासनाने चौकशी करुन प्रकल्पांचे कालवे, द्वार दुरुस्ती त्वरीत करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

पाटोदा व मासरूळ या दोन ल.पा. प्रकल्पांची कामे वगळता इतर ल.पा. प्रकल्पांची कालवे व द्वार दुरूस्ती कामांचा समावेश सन २०२०-२१ च्या प्रापणसूचीत अंतर्भूत आहे.

मासरूळ ल.पा. प्रकल्पाची कालवा दुरूस्तीची कामे लोकसहभागातून करून कालव्याद्वारे सिंचन करण्यात आले आहे.

पाटोदा ल.पा. प्रकल्प येथे लाभधारकांची कालव्याद्वारे पाणी मागणी नसल्याने व सदर प्रकल्प जलसंधारण विभागास हस्तांतरीत झाला असल्याने काम करण्यात आले नाही.

(२)

अ) सन २०२०-२१ च्या प्रापणसूचीत समाविष्ट असलेल्या प्रकल्पांपैकी दहिद ल.पा. वगळता इतर सर्व प्रकल्पांची कालवे दुरूस्ती व द्वार दुरूस्तीची कामे मार्च,२०२१ पर्यंत पूर्ण करण्यात आली आहेत.

आ) दहिद ल.पा. प्रकल्प, ता. बुलढाणा येथील लाभधारकांची कालव्याद्वारे पाणी सोडण्याची मागणी नसल्याने नियमित देखभाल व दुरूस्ती काम करण्यात आले नाही.

(३) प्रापणसूचीत समाविष्ट दहिद ल.पा. प्रकल्प वगळता सर्व कामे पूर्ण झाली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुमरी (ता.शहापूर, जि. ठाणे) येथील धरणात दगड गोट्यांचा भरणा करण्यात आल्याबाबत**

**(९) ४६५७० (१०-११-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाच्या सुधारित २०६.०३ कोटी इतक्या मुमरी धरणाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास जलसंपदा विभागाची प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर शहापूर तालुक्यातील सारंगपुरी आणि खैरे या परिसरात मुमरी धरणाचे काम प्रत्यक्षात सन २०१८ मध्ये सुरु झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दगड गोटे आणि सिमेंटच्या पिशव्यांचा भरणा केल्याने बंधाऱ्यातील माती वाहून गेली असता सदर दगड व सिमेंटच्या पिशव्या निदर्शनास आल्या असून रात्रीच्या सुमारास ठेकेदाराकडून काम करण्यात येत असल्याने सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिकारी आणि ठेकेदारावर कारवाईची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुमरी धरणाच्या भूसंपादनात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला असून ज्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची आवश्यकता नसतानाही जमीन संपादित करण्यात आली आहे तसेच स्थानिकांच्या जमिनीचा प्रश्न प्रलंबित असतानाही धनिकांची अकृषक, खडकळ जमीन संपादित करण्यात येत असल्याने सदर प्रकरणी एस आय टी मार्फत चौकशी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जलसंपदा विभागाने सन २०११, २०१२, २०१५ व २०१७ मध्ये काढलेल्या परिपत्रकात जमिनीचे संपूर्ण संपादन झाल्याशिवाय त्यावरील प्रकल्पाच्या कोणत्याही दायीत्वास मान्यता देऊ नये असे स्पष्ट निर्देशाचे पालन करणे बंधनकारक असतानाही ज्या ठिकाणी काम करावयास घेतले त्या ठिकाणची जमीन संपादन झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सर्व संबंधित ठेकेदारावर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पावसाळयात धरणाच्या मातीकामाचे नुकसान होवू नये म्हणून मातीकामाच्या संरक्षणासाठी सिंमेटच्या रिकाम्या गोण्यांमध्ये मुरूम/रेती भरून धरणाच्या पृष्ठभागावर ठेवण्यात येतात व पावसाळयानंतर त्या काढून टाकण्यात येतात.
सद्य:स्थितीत पावसाळा संपल्याने सदरहू मातीकामाच्या संरक्षणासाठी ठेवण्यात आलेल्या सिंमेटच्या गोण्या काढून टाकण्यात आल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
मुमरी धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक मौजे सारंगपुरी, खैरे, कोठारे व जुनवणी या चार गावात आदिवासी खातेदारांच्या जमिनींचा समावेश आहे. यासंदर्भात शासन नियमानूसार आवश्यक दस्ताऐवजांची छाननी करून खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी करण्याची प्रक्रीया पार पाडली जाते. सदर प्रक्रीयेत विभागीय आयुक्त यांचेमार्फत आदिवासी जमीन हस्तांतरीत करणेसंबंधी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार मंजूरी तद्नंतर उपविभागीय अधिकारी, भिवंडी विभाग, भिवंडी यांचे कार्यालयामार्फत अंतिम निवाडा झालेनंतर थेट खरेदी करण्याबाबतचे अंतिम आदेश प्राप्त झाल्यानंतर जमीन खरेदी केलेली आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयातील अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील झाशीनगर उपसा सिंचन योजनेच्या कामात तिप्पट वाढ झाली असल्याबाबत**

**(१०) ४६६४२ (११-१०-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील झाशीनगर उपसा सिंचन योजनेचे काम सन १९९४-९५ मध्ये सुरु झाले असून व आतापर्यंत रु ८० कोटी खर्च झाला असून मात्र अधिकाऱ्यांच्या चुकीच्या नियोजनामुळे मागील २५ वर्षात योजनेच्या खर्चात तिप्पट वाढ झाली असून अद्याप पर्यंत फक्त ५० टक्केच काम झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त योजनेचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे. झाशीनगर उपसा सिंचन योजनेस रु. १४.४३ कोटी किंमतीस दि. १८/१०/९६ च्या महामंडळाच्या निर्णयान्वये मूळ प्रशासकीय मान्यता व दि. १८/०३/२०१७ रोजीच्या महामंडळाच्या निर्णयान्वये रु. १२७.२१ कोटी किंमतीस द्वितीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. या योजनेच्या प्रत्यक्ष कामांना मार्च २००२ मध्ये सुरुवात झाली असून मार्च २०२२ अखेर योजनेवर रु. ८३.९८ कोटी खर्च झाला आहे. सदर योजना कार्यान्वित झाली असुन १९५० हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. वितरण प्रणालीचे काम राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (NBWL) च्या मान्यतेच्या अभावी पुर्ण होऊ शकले नाही.

(२) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रकल्पांतर्गत येत असलेल्या वन जमीनी वळतीकरणाचा प्रस्ताव विभागामार्फत वन विभागाच्या संकेतस्थळावर सादर करण्यात आलेला आहे.

(३) राष्ट्रीय वन्यजीव मंडळ (NBWL) च्या मान्यतेअभावी योजनेची मुख्य कालव्यावरील व वितरणप्रणालीचे उर्वरीत कामे पूर्ण होऊ शकली नाहीत.

---

**कसारा-किन्हवली-शहापूर-वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील पोलीस ठाणेची इमारत जीर्ण झाल्याबाबत**

**(११) ४६६५१ (२७-१०-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कसारा-किन्हवली-शहापूर-वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) या ठिकाणी पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जीर्ण होत चाललेल्या बैठ्या इमारतीचे कामकाज पाहावे लागत असल्याने पोलिस ठाण्याची इमारत उभारण्याची मागणी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणांची सुरक्षा, मुंबई-नाशिक महामार्गावरील अपघात, कसारा घाट यांच्या सुरक्षेसह गावातील तंटे, वाहतूक कोंडी, मोर्चे, आंदोलने आणि मंत्र्यांचे दौरे आदी काम पोलिसांना करावे लागत असल्याने पोलिसांकरिता निवासस्थान अशा सुसज्ज इमारती बांधण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने पोलिसांकरिता सुसज्ज अशी इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :** (१) कसारा पोलीस ठाणे व किन्हवली पोलीस ठाणे इमारतीचे बांधकाम करण्यासाठी सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित यांनी नियुक्त केलेल्या PMC इंजिनिअर यांनी बांधकामाचा आराखडा सादर केला आहे. शहापूर पोलीस ठाणेची जागा ही महसूल, पोलीस व सार्वजनिक बांधकाम यांची संयुक्त मालकीची असुन तिचे क्षेत्रफळ ४७९२.६० चौ.मी आहे. पोलीस खात्याची स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्याने, प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

पोलीस अधीक्षक, ठाणे (ग्रा.) येथील वासिंद पोलीस ठाणे करिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम हे सी.एस.आर. फंडातून करुन घेत आहे.
(२) व (३) राज्यातील पोलीस सेवा निवासस्थान इमारतीच्या बांधकामाचे निकष व प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर सुरू आहे. प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धतेनुसार पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्याकडून बांधकाम करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय शहापूर येथे पदे रिक्त असल्याबाबत**

**(१२) ४६६७४ (०९-१०-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या उपप्रादेशिक कार्यालय शहापूर येथे मंजूर असलेल्या ४३ पदांपैकी ८ विपसन निरीक्षक, १२ प्रतवारी कर, दोन कनिष्ठ सहाय्यक अशी एकुण ३२ पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रादेशिक कार्यालय जव्हार येथील उपप्रादेशिक उपव्यवस्थापक या पदावरील दोन कर्मचारी राज्यसेवेत वर्ग केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त महामंडळामार्फत शहापूर तालुक्यात कोट्यावधी रुपयांचा भात खरेदी करण्यात येऊन भाताची भरडई केली जात असून कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने भात भरडईला विलंब होत असल्याने शेतकऱ्यामध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२१-१२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.
सदर कार्यालीयातील मंजूर आकृतीबंधानुसार ४३ पदे मंजूर असून त्यापैकी २२ पदे कार्यरत आहेत व २१ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
हंगाम २०२१-२२ मध्ये एकूण १३,३५९ शेतकऱ्यांकडून ४५१२०२.०३ क्विंटल धानाची खरेदी झाली असून त्यापैकी ४४३६२४.०५ क्विंटल धानाची भरडाई झालेली आहे.
(४) गट क मधील लिपीकवर्गीय पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर व नांदुरा (जि.बुलडाणा) तालुक्यातील अनेक गावांत कृषीपंपाचे रोहित्र नादुरुस्त असल्याबाबत**

**(१३) ४६६७९ (०९-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर व नांदुरा (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक गावांत कृषीपंपाचे रोहित्र नादुरुस्त असून त्यांची दुरुस्ती करण्यासाठी महावितरण कंपनीच्या संबंधितांकडून टाळाटाळ केली जात असल्याचे दि.१८ मे,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषीपंपाचे रोहित्र दुरुस्ती साहित्याचा भारही संबंधित शेतकऱ्यालाच करावा लागत असल्याने येथील शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नादुरुस्ती कृषीपंपांचे रोहित्रे तातडीने दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सद्यस्थितीत मलकापूर विभागात ९९७ व नांदुरा विभागात १,६२२ रोहित्रांमार्फत कृषीपंपाना वीज पुरवठा केला जातो. मलकापुर व नांदुरा विभागा अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये (माहे जून अखेर) एकूण ०८ रोहित्रे (मलकापुर ०४, नांदुरा ०४) नादुरुस्त झाली आहेत. सदर रोहित्रे हे कृषीपंप धारकांचे असुन त्यावरील ८० % ग्राहकांनी चालू बिलाचा भरणा न केल्याने रोहित्रे बदलणे बाकी आहे.

मलकापूर विभागाअंतर्गत वितरण रोहित्रे दुरूस्ती करण्यासाठी एकूण १० एजन्सीची नेमणूक करण्यात आली असून, दुरुस्त झालेली रोहित्रे बदलण्यासाठी एकूण ०४ एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. सदर एजन्सीकडूनच रोहित्रे दुरुस्त व बदलण्यात येतात. त्यामुळे रोहित्रे दुरुस्ती साहित्याचा खर्च कृषी ग्राहकाला करावा लागत नाही.नादुरुस्त रोहित्रे दुरुस्त करण्यासाठी लागणाऱ्या ऑईलचा सध्या मुबलक साठा उपलब्ध असून ऑईल अभावी रोहित्रे नादुरुस्त राहणार नाही याची दक्षता घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गंगाखेड (जि.परभणी) येथील ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात अवैध गैरकारभार सुरु असल्याबाबत**

**(१४) ४६७६८ (३१-१०-२०२२). श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यात ग्रामीण व शहरी भागात मागील वर्षभरापासून मोठ्या प्रमाणात अवैध गैरकारभार सुरु असून सदर पोलीस अधिक्षक व स्थानिक पोलीस प्रशासन गुन्हेगारांना संरक्षण देत असल्याचेही माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात गंगाखेड मतदार संघातील अवैध गैरकारभार बंद करण्याबाबत पोलीस अधिक्षक व तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना स्थानिक लोकप्रतिनिधी (गंगाखेड) यांनी निवेदन देऊन वारंवार मागणी केली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच गंगाखेड (जि.परभणी) येथील स्थानिक लोकप्रतिनिधीनी सार्वजनिक कामाकरीता व तालुक्यातील अवैध वाळू उपसा, जुगार, मटका, अनधिकृत व्यवसायाप्रकरणी कारवाई करण्याबाबतचे निवेदन पोलीस अधिक्षक कार्यालय, परभणी येथे घेऊन गेले असता पोलीस अधिक्षक यांनी अपमानास्पद वागणूक देऊन कार्यालयाबाहेर काढल्याचे दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) परभणी जिल्ह्यातील अवैध धंद्यावर पोलीस घटकांकडून नियमितपणे कारवाई करण्यात येत असून गुन्हेगारांना संरक्षण दिले जात नाही.
(२) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन प्राप्त झालेले नाहीत. तथापि, गंगाखेड मतदार संघामध्ये सन २०२१ मध्ये अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुध्द एकुण ९४ केसेस तसेच अवैध जुगार व मटका चालविणाऱ्या गुन्हेगाराविरुध्द एकुण १३० केसेस करण्यात आल्या आहेत.
(३) गंगाखेड (जि.परभणी) येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी अवैध व्यवसायावर कारवाई करण्याबाबतचे निवेदन पोलीस अधीक्षकांना देण्याकरीता गेले असता त्यांना कोणत्याही प्रकरणाची अपमानास्पद वागणूक देण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) विलंब झालेला नाही,

---

**महानिर्मिती आणि एनटिपीसी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून २५०० मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्याबाबत**

**(१५) ४६७८५ (२०-०९-२०२२). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या अल्ट्रा मेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क योजनेच्या पर्याय क्रमांक ८ च्या माध्यमातून महानिर्मिती कंपनीव्दारा नॅशनल थर्मल पॉवर कार्पोरेशन समवेत संयुक्त उद्यम कंपनीच्या माध्यमातून राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदरहु सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याबाबत महानिर्मिती व एनटीपीसी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत लागणाऱ्या जागेसाठी स्वारस्य अभिव्यक्ती प्रसिध्द केली असून, या अनुषंगाने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून अंतिमत: जमीन निश्चित करण्यात येणार आहे हे खरे आहे काय ,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जमीन निश्चिती करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास राज्यात कुठे कुठे जमीन निश्चित करण्यात आली, तथा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीची प्रक्रिया कोणत्या स्थितीत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) होय, शासन निर्णय दिनांक १ जुन, २०२२ अन्वये केंद्र शासनाच्या सौर पार्क योजनेतील अल्ट्रा मेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क या घटकांतर्गत राज्यात अल्ट्रामेगा नवीकरणीय ऊर्जा पार्क उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनीस नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड सोबत संयुक्त उद्यम कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर संयुक्त उद्यम कंपनीव्दारे राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

(२) व (३) होय, या संदर्भात महानिर्मिती कंपनी व नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यात दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर २५०० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी लागणाऱ्या जमिनीबाबत महानिर्मिती कंपनीव्दारे स्वारस्य निविदा दिनांक १८/०९/२०१९ रोजी वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे. सदर स्वारस्य निविदे अंतर्गत एकूण ३९ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. अद्यापि याबाबत अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गिरणा नदीवरील ( ता.भडगांव, जि.जळगांव ) वरखेडे-लोंढे प्रकल्पाचे कालवे व पाटचाऱ्या बंदिस्त करण्याबाबत**

**(१६) ४६७९४ (११-१०-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणा नदीवरील ( ता.भडगांव, जि.जळगांव ) वरखेडे-लोंढे प्रकल्पाचे कालवे व पाटचाऱ्या बंदिस्त करण्याबाबतचा तुलनात्मक आराखडा माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू आराखडयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास,उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आराखडयास शासनाने मंजूरी दिली आहे काय, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :**(१) अंशत: खरे आहे. गिरणा नदीवरील वरखडे लोंढे प्रकल्पाचे कालवे व पाटचाऱ्या बंदिस्त करण्याबाबतचा तुलनात्मक आराखडा माहे जून २०२२ महामंडळाकडे प्राप्त झाला होता. त्यानुसार महामंडळाच्या दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पाचे कालवे व पाटचाऱ्या बंदिस्त वितरण प्रणालीद्वारे करणेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(२) सदर आराखड्यामध्ये प्रकल्पाचे कालवे व पाटचाऱ्या बंदिस्त वितरण प्रणालीद्वारे प्रस्तावित करण्यात आले आहेत.
(३) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. महामंडळाच्या दिनांक २३/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकल्पाचे कालवे व पाटचाऱ्या बंदिस्त वितरण प्रणालीद्वारे करणेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवपूरातील आधारनगर (जि.धुळे) येथे गोंदूर शिवारातील शेतजमिन नावावर करुन देण्याच्या कारणावरुन गर्भवती महिलेवर विष प्रयोग केल्याबाबत**

**(१७) ४६७९५ (३१-१०-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवपूरातील आधारनगर (जि.धुळे) येथे गोंदूर शिवारातील शेतजमीन नावावर करुन देण्याच्या कारणावरुन श्रीमती आशाबाई पाटील या गर्भवती महिलेवर विष प्रयोग केल्याचा प्रकार दिनांक १ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी स्थानिक पोलिस स्थानकात कोणत्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :**(१), (२) व (३) सदर प्रकरणात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार पश्चिम देवपुर पोलीस ठाणे, धुळे येथे गु.र.नं. ९९/२०२२, भा.द.वि. कलम ३०७, ३१२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.
परंतु सदर प्रकरणी सखोल तपास केला असता सदर महिला यांनी जबाबात नोंदविलेली हकीगत ही खोटी आढळुन आल्याने सदर गुन्ह्याचा "ब" समरी अहवाल मा. न्यायालयात सादर करण्यात आला आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**भद्रावती (जि.चंद्रपूर) येथे निर्वस्त्र अवस्थेतेत तरुणीचा मृतदेह आढळून आल्याबाबत**

**(१८) ४६८२० (३१-१०-२०२२). श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावती (जि.चंद्रपूर) येथे निर्वस्त्र अवस्थेत तरुणीचा शिरावेगळे धड असलेला मृतदेह माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-१२-२०२२) :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आलेली असून पो. स्टे. भद्रावती येथे अप क्र. १४१/२०२२ कलम ३०२, २०१, ३४, १२० (ब) भा दं वि अन्वये दिनांक ०४.०४.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) मृतक हिची ओळख पटविणेकरिता पोलिसांचे ३ पथके तयार करुन वेगवेगळया घटनास्थळावरुन शोध घेवून सर्वोतोपरी प्रयत्न करुन ओळख पटविण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून गुन्ह्यातील एकूण ०२ आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दि. २७.०६.२०२२ रोजी दाखल करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हातील आदिवासी मुलींच्या वसातीगृहामध्ये असलेल्या घाणीच्या साम्राज्याबाबत.**

**(१९) ४६८४६ (०९-१०-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सालेकसा, सडकअर्जुनी, देवरी, अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) येथील आदिवासी मुलींच्या वसतीगृहामध्ये अस्वच्छता असल्याने विद्यार्थीनींच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची गंभीर बाब दक्षता समितीच्या माहे मे २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतीगृहामध्ये मुलींना पोषक आहार मिळत नसल्याचे तथा अभ्यासाकरीता पोषक वातावरण नसल्याचे आढळुन आले, हे खरेआहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतीगृहातील मुलींना पोषक आहार मिळण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२०-०१-२०२३) :** (१), (२) व (३)

अशा आशयाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती. तथापि, अशी वस्तुस्थिती नाही. वसतीगृहातील विद्यार्थीनींना देण्यात येणारे भोजन रुचकर व पोषक आहार देण्यात येत असून याबाबत विद्यार्थीनींची कोणतीही तक्रार नाही.

विद्यार्थीनींना अभ्यासाकरीता स्पर्धा परीक्षा पुस्तके व आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तसेच स्वतंत्र ग्रंथालय तसेच संगणक कक्ष उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

वसतीगृहामध्ये विद्युत खंडीत झाल्यास विद्यार्थीनीना त्रास होवू नये म्हणून इन्व्हेटर बसविण्यात आले आहे. प्रकल्प कार्यालयामार्फत दर महिन्याच्या गृहपाल यांच्या आढावा बैठकीत आरोग्य, स्वच्छता या बाबींवर विशेष लक्ष दिले जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्हयामध्ये वैनगंगा नदीवरील तेढवा-शिवणी**
**उपसासिंचन योजनेचा लाभ मिळात नसल्याबाबत**

**(२०) ४६८५९ (१२-१०-२०२२). श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदीया जिल्हयातील वैनगंगा नदीच्या काठावर सात वर्षापूर्वी शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोटयावधीं रुपये खर्च करून तेढवा-शिवणी उपसा सिंचन योजना राबविण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त उपसा सिंचन योजनेच्या ठिकाणी पाणी उपलब्ध नसताना त्यांच ठिकाणी नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनेचे काम करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील नागरिकांनी उपसा सिंचन योजनेच्या जागेवर वैनगंगा नदीवर आधि बॅरेजचे बांधकाम करण्याची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नदीपात्रामध्ये पाणीच उपलब्ध नसतांना नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनेला स्थानिक नागरिकांचा विरोध असतांना उपसा सचिंन योजना राबविण्यात येण्यामागील कारणे काय आहेत,

(५) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवेगाव-देवरी उपसा सिंचन योजनेच्या कामाला स्थगिती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय,

तेढवा शिवनी उसिंयो वैनगंगा नदीच्या तिरावर तेढवा गावाजवळ बांधण्यात आलेली आहे. सदर योजनेची सुप्रमा

किंमत रु. १०६.५५ कोटी असून जुन २०२२ अखेर रु. ९७.११ कोटी खर्च झालेले आहे. सदर योजना सन २०१७ मध्ये कार्यान्वित झाली आहे. योजनेचे एकूण ४९३८ हे. सिंचन क्षमता असून त्यापैकी २५५० हे. सिंचन क्षमता निर्माण झाली. उर्वरीत कामे प्रगतीपथावर आहे.

(२) नाही,

गोंदिया जिल्हयातील बाघ प्रकल्पाच्या किंन्ही व काटी वितरीकेच्या पुच्छ भागामध्ये पाणी पोहचत नसल्याने लोकांची व स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी असल्यामुळे तेढवा शिवनी उपसा सिंचन योजनेस मान्यता देण्यात आली. तसेच बाघ प्रकल्पाच्या पांढराबोडी वितरीकेच्या पुच्छ भागामध्ये पाणी देण्याकरीता देवरी नवेगाव उपसा सिंचन योजनेस मंजुरी देण्यात आली. तेढवा शिवनी उसिंयो व देवरी नवेगाव उपसा सिंचन योजना करीता अनुक्रमे १७.२६ दलघमी व १२.०९ दलघमी पाणी उपलब्ध आहे.

(३) होय,

या योजना करीता डांगुर्ली बॅरेज प्रस्तावित असून डांगुर्ली बॅरेजच्या प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव तयार करणेची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) देवरी नवेगाव उपसा सिंचन योजना करिता नदीपात्रामध्ये १२.०९ दलघमी पाणी उपलब्ध आहे. याबाबत मुख्य अभियंता, जलविज्ञान, नाशिक यांचे पत्र क्र. HP/Gosikhurd/TS-४/ (५/०६)/१७५५ दिनांक ०६/०९/२०११ अन्वये प्रमाणपत्र प्राप्त आहे. योजना कार्यान्वित झाल्यास बाघ प्रकल्पाच्या पांढराबोडी वितरीकेच्या पुच्छ भागामध्ये पाणी पोहोचविणे शक्य आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

देवरी नवेगाव उपसा सिंचन योजनेचे काम प्रगतीपथावर असून कामाला स्थगिती देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

---

**कोन (ता.पनवेल,जि.रायगड) येथील भाडेतत्वावरील घरांच्या दुरुस्तीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि म्हाडाचे मुंबई मंडळ यानी लागणाऱ्या खर्चास नकार दिल्याबाबत**

**(२१) ४६८९४ (२१-०९-२०२२). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोन (ता.पनवेल, जि .रायगड) येथील एमएमआरडीएच्या भाडेतत्वावरील घरांच्या दुरुस्तीचा वाद अद्याप मिटला नसून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि म्हाडाचे मुंबई मंडळ या दोन सरकारी यंत्रणांनी ५० कोटी रुपये खर्च करण्यास स्पष्ट नकार दिला असल्याचे माहे एप्रिल २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घरांची दुरावस्था झाली असून त्यांची दुरुस्ती न करता ती रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाने एमएमआरडीएला आणि एमएमआरडीने म्हाडाला हस्तांतरीत केली आहेत, हे ही खरे आहे काय?

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उपरोक्त घरांच्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१), (२), (३) व (४) एमएमआरडीएकडून रेंटल हौसिंग योजनेमध्ये गिरणी कामगारांच्या घराकरीता कोन, पनवेल येथे २,४१७ जोड सदनिका उपलब्ध करुन दिलेल्या होत्या. सदर सदनिकांचा कोविड विलगीकरण कक्ष म्हणून नवी मुंबई व पनवेल महानगरपालिकेकडे ताबा होता. सदर सदनिकांची दुरावस्था झालेली असल्यामुळे त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने सर्व ११ इमारतींच्या दुरुस्तीकरीता रु.५२.७१ कोटी खर्च अपेक्षित आहे व हा खर्च, तत्कालीन मा. मंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार म्हाडाकडून एमएमआरडीएला प्राप्त होणाऱ्या सदनिकांच्या किंमतीतून वजा करुन, उर्वरित रक्कम म्हाडाने एमएमआरडीएला प्रदान करावी असे ठरले. त्यानुसार पुढील कार्यवाही एमएमआरडीए स्तरावर सुरु आहे.

---

**दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगांव) थर्मल पॉवर स्टेशनबाबत**

**(२२) ४६९३८ (१४-१०-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिपनगर (ता.भुसावळ, जि.जळगांव) येथे उभारण्यात आलेल्या थर्मल पॉवर स्टेशन येथे मोठया प्रमाणात उर्जा निर्मिती होत असून, उक्त थर्मल पॉवर स्टेशन सुरु करताना जवळील गावांत मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येईल असे झालेल्या करारामध्ये नमूद करण्यात आले असुनही अद्यापि वृक्ष लागवड करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, थर्मल पॉवर स्टेशनसाठी जमीन अधिग्रहण करताना स्थानिक लोकांना रोजगार देखील देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते, परंतू उक्त आश्वासनानुसार स्थानिकांना नोकरीमध्ये प्राधान्य योग्य प्रमाणात दिले नसल्याने स्थानिकांनी निदर्शने केली होती, हे ही खरे आहे काय,.

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी करुन थर्मल पॉवर जवळील गावांत वृक्ष लागवड करण्यासाठी व स्थानिकांना उक्त प्रकल्पात रोजगार मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

असा कोणताही करार करण्यात आलेला नाही. परतुं केंद्र व राज्य प्रदूषण मंडळाच्या निर्देशानुसार वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

महानिर्मिती कंपनीच्या नियम व धोरणानुसार स्थानिक जमीन अधिग्रहीत केलेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवारांच्या पात्रतेनुसार भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे दि. ३०.९.२०२२ अखेर ८२९ प्रकल्पग्रस्त उमेदवारांना (PAP) नोकरीत रुजू करुन घेण्यात आलेले असून ३९० प्रकल्पग्रस्त उमेदवार प्रगतकुशल प्रशिक्षणार्थी म्हणून सध्या कार्यरत आहेत. तसेच भुसावळ औष्णिक विद्युत केंद्रात कार्यरत कंत्राटदाराकडील बहुसंख्य कंत्राटी कामगार हे स्थानिक आहेत.

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे जमीन अधिग्रहीत केलेल्या स्थानिक ग्रामस्थांकडून निदर्शने केल्याचे आढळून आलेले नाही.

(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**तळवेल-ओझरखेडा-पिंपळगाव (ता.भुसावळ) या तीन गावांमध्ये घरफोडल्याच्या घटना वाढत असल्याबाबत**

**(२३) ४६९६२ (२७-१०-२०२२). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळवेल-ओझरखेडा-पिंपळगाव (ता.भुसावळ) या तीन गावांमध्ये एकाच वेळी चोरट्यांनी ११ घरे फोडल्याची घटना दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी वरणगाव पोलीस स्टेशन अंतर्गत एकूण ११ ठिकाणी घरफोडी, चोरी व चोरीचा प्रयत्न अशा घटना घडल्या आहेत.

सदर घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने वरणगाव पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड संहिता कलम ४५७, ३८० अन्वये, गु.र.क्र. १२४/२०२२, १२५/२०२२ व १२६/२०२२ असे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर तीनही गुन्ह्यांचा तपास वरणगाव पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांच्यामार्फत सुरु आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

**अंधारी व्याघ्र प्रकल्पातील (जि.चंद्रपूर) ताडोबा बुकींगच्या नावाखाली डुप्लीकेट वेबसाईट तयार कल्याबाबत**

**(२४) ४७००८ (३१-१०-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडोबा (जि.चंद्रपूर) येथे अंधारी व्याघ्र प्रकल्पातील ताडोबा बुकींगच्या नावाखाली डुप्लिकेट वेबसाईट तयार करुन पर्यटकांकडून पैसे काढत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर डुप्लीकेट वेबसाईट तयार करणाऱ्या संबंधितावर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :** (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या कार्यक्षेत्रात दि.०४.०७.२०२२ रोजी एका व्यक्तिची ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर वन विभागाचे सफारी बुकींग करताना अधिकृत संकेतस्थळ असल्याचे भासवून फसवणूक केल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे. याबाबत अज्ञात आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन, दुर्गापूर येथे गु. र. क्र.१२२/२०२२ भादंवि कलम ४१९ सह कलम ६६ (सी), ६६ (डी) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील संकेतस्थळे डोमेन करणाऱ्या कंपन्यांविरुध्द फेक संकेतस्थळे बंद करण्यासाठी सीआरपीसी च्या कलम ९१ अन्वये नोटीस बजावली असून आरोपीचा शोध घेण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील पूर्णा धरण परिसरात अवैध उत्खनन होत असल्याबाबत**

**(२५) ४७२९१ (१०-११-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयातील चांदूरबाजार शहरासह जिल्हा व जिल्हाबाहेरील १०७ गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या पूर्ण मध्यम प्रकल्पाची सुरक्षा तेथील अकार्यक्षम अभियंत्यामुळे धोक्यात आली असल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील पूर्णा धरण परिसरात अवैध उत्खनन होत असूनही येथील प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध उत्खनन रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही. धरण सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यकतेप्रमाणे उपाययोजना वेळोवेळी करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही
(४) प्रश्न उदभवत नाही

---

## पुरंदर (जि.पुणे) येथील पुरंदर उपसा योजनेच्या देखभाल-दुरुस्तीबाबत

**(२६) ४७३४० (१०-११-२०२२). श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुरंदर (जि.पुणे) येथील पुरंदर उपसा योजनेच्या व्हॉल्वमधून अनेक ठिकाणी पाण्याची गळती सुरु असल्याचे दिनांक ३०/०५/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी पाणी गळतीमुळे पाणी योग्य दाबाने न मिळणे, पाणी वेळेवर न पोहचणे, पाण्याचा अपव्यय होणे, पाणी चोरी होणे, इत्यादी समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने सदरहू पाणी गळती व पाणी चोरी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१२-२०२२) :** (१) होय.
मागील १५ वर्षांपासुन पुरंदर उपसा सिंचन योजना सांडपाण्यावर सुरु असल्याने ज्या ठिकाणी वॉल्व, विमोचक (Outlet), जोडणी (Connections) आहेत त्या ठिकाणी गंज लागण्याचे प्रमाण जास्त असल्यामुळे पाण्याची गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
पाणी गळतीमुळे पाणी योग्य दाबाने न मिळणे, पाणी वेळेवर न पोहचणे या समस्या आहेत. तथापि वेळेत दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही केल्याने सुरळीत पाणीपुरवठा सुरु आहे. पाणी चोरी होण्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(३) कालवा आवर्तन व बंद कालावधी याचा विचार करता, उपलब्ध होणाऱ्या कालावधीच्या अनुषंगाने सदर योजनेच्या वॉल्वमधुन पाणी गळती रोखणे, योजनेची देखभाल / दुरुस्ती व अनुषंगिक कामे पुढील दोन वर्षात पूर्ण करणेचे नियोजन आहे.
सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात बिगर सिंचन प्रापणसूचीतून रु.१.२० कोटी निधीची तरतूद केली आहे. त्यामधुन आवश्यक तेवढी कामे चालू आर्थिक वर्षात व उर्वरित कामे पुढील आर्थिक वर्षातील बिगर सिंचन प्रापणसूचीतून पूर्ण करणेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घानोरा बंगला (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे नियोजन समितीच्या निधीचा बनावट कागदपत्राच्या आधारावर अपहार झाल्याबाबत

**(२७) ४७३८० (२८-१०-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घानोरा बंगला (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथे नियोजन समितीच्या निधीचा बनावट कागदपत्राच्या आधारावर अपहार झाल्याचा प्रकार माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी तत्कालीन महिला सरपंचासह दोन ग्रामसेवकांविरुद्द सेनगाव पोलीस ठाण्यात गुन्हा गोंद करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) होय हे खरे आहे.
(२) व (३)
सदर प्रकरणी महिला सरपंचासह दोन ग्रामसेविकांविरुध्द सेनगाव पोलीस स्टेशन, जि.हिंगोली येथे गु.र.नं.१६२/२०२२ भा.द.वि कलम ४२०, ४६८, ४७१, ४६३, ४६४, ४६५, ४७४, २१८, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
सदर गुन्ह्यात ३ आरोपी निष्पन्न झाले असून आरोपींकडून एकुण अपहारीत रुपये ५६०००/- रक्कमेपैकी रुपये २६,२१०/- इतकी रक्कम शासन खात्यात जमा करण्यात आली आहे.
सदर प्रकरणात मा. न्यायालयात दिनांक ३०.११.२०२२ रोजी दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## ग्रामनगर भागात (जि.चंद्रपूर) येथे कृत्रिम गर्भधारणेच्या नावाखाली निपुत्रिक महिलांची फसवणूक झाल्याबाबत

**(२८) ४७५२७ (३१-१०-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामनगर (जि.चंद्रपूर) येथील एका खाजगी रुग्णालयात कृत्रिम गर्भधारणा (इन विट्रो फर्टिलाइजेशन) तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अपत्य नसलेल्या जोडप्यांना अपत्य सुख देण्याच्या नावाखाली अनेक जोडप्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२३) :**(१) व (२) होय,
ग्रामनगर (जि.चंद्रपूर) येथील एका खाजगी रुग्णालयात कृत्रिम गर्भधारणा (इन विट्रो फर्टिलाइजेशन) तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अपत्य नसलेल्या जोडप्यांना अपत्य सुख देण्याच्या नावाखाली फसवणुक केलेल्या डॉक्टर विरूध्द रामनगर पोलीस ठाणे, चंद्रपूर येथे अप.क्र.७१६/२०२२ ,भादंवि कलम ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथे आंतरराष्ट्रीय संस्थेच्या नावाखाली फॅशन डिझाइन विद्यार्थ्यांची फसवणूक केल्याबाबत

**(२९) ४७५३३ (३१-१०-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे आंतरराष्ट्रीय संस्था असल्याच्या नावाखाली फॅशन डिझाइनिंगचे शिक्षण देणा-या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन डिझाइन (आयएनआयएफडी) या संस्थेमध्ये प्रवेश घेतलेल्या सुमारे ३५० विद्यार्थ्यांची फसवणूक झाल्याचा प्रकार माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील संस्थेने विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाची परवानगी नसताना बनावट प्रमाणपत्र दिल्याचे व अडीच ते साडेतीन लाख रुपये शुल्क आकारण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२३) :**(१)दि २२/०४/२०२२ रोजी अर्जदार व इतर विद्यार्थी यांनी इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन डिझायन (आयएनआयएफडी) या संस्थेविरूद्ध फसवणुक केलेबाबत तक्रार अर्ज दिला होता.
(२) व (३) सदर प्रकरणी दिलेल्या तक्रार अर्जाच्या चौकशी दरम्यान विद्यार्थ्यांना देण्यात आलेले प्रमाणपत्र बनावट नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

तसेच तक्रार अर्जाच्या अनुषंगाने इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन डिझायन (आय.एन.आय.एफ.डी.) या संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडे चौकशी केली असता सद्यस्थितीत विद्यार्थ्यांची संस्थेविरुध्द काही एक तक्रार नसलेबाबत सांगितले असून सदर संस्थेमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिध्देश्वर विद्यालय, माजलगाव (जि.बीड) येथे शिक्षकांनी विद्यार्थी प्रवेशासाठी पालकांकडून जास्तीची रक्कम घेतल्याबाबत**

**(३०) ४७५५३ (२८-१०-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिध्देश्वर विद्यालय, माजलगाव (जि.बीड) येथील शिक्षकांनी विद्यार्थी प्रवेशासाठी पालकाकडून जास्तीची रक्कम घेताना दिनांक १४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी, शिक्षणाधिकारी व पोलीस अधिकारी यांनी पकडले असून गटशिक्षण अधिकारी, माजलगाव यांच्या तक्रारीवरुन गु.र.नं.०१४२/२२ कलम ३८४, ३४ अन्वये माजलगाव (शहर) पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू तपासाअंती सिध्देश्वर विद्यालयाच्या स्थानिक कार्यवाह यांना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) होय हे खरे आहे.
(२) व (३)

सदर प्रकरणी गट शिक्षण अधिकारी, माजलगाव यांच्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १४२/२०२२ कलम ३८४,३४ भा.द.वि सह महाराष्ट्र शैक्षणिक संस्था कायदा १९८७ कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकुण ६ आरोपी निष्पन्न झाले असून ४ आरोपींना अटक करण्यात आले होते तर २ आरोपींना मा. न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजूर केला असल्याने त्याविरोधात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे अपिल करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्यात शाळा प्रवेशासाठी पालकांकडुन डोनेशन स्वरुपात आरोपींनी घेतलेली रक्कम रुपये १,७६,५००/- तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. तसेच, सदर प्रकरणी आरोपींचे हस्ताक्षर व सहीचे नमुने शासकीय दस्तऐवज परिक्षक गुन्हे अन्वेषण विभाग, औरंगाबाद यांचेकडे परिक्षणासाठी पाठविण्यात आले आहेत.

सदर प्रकरणाचा पुढील तपास चालू आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

## भोकरदन (जि.जालना) येथे अवैध कारभाराचे केंद्र झाले असल्याबाबत

**(३१) ४७५९६ (२७-१०-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि.जालना) हे अवैध कारभाराचे केंद्र होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शहरात घरफोडी, मोटर सायकल चोरीच्या घटना आठवडे बाजारात खरेदीसाठी आलेल्या नागरिकांच्या हातातील मोबाईल, पर्स चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाही पोलिस प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी दिवसा व रात्रीचे गस्त पथके वाढवून अवैध कारभार बंद करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :**(१) व (२) हे खरे नाही.

भोकरदन शहर व परिसरात सन २०२२ मध्ये ऑक्टोंबर, २०२२ अखेर अवैध दारु विक्रीबाबत १०५, तर जुगारासंदर्भात २५ प्रकरणी कारवाई करण्यात आल्या आहेत.

तसेच भोकरदन शहर व परिसरात घडणाऱ्या गुन्ह्यांबाबत ऑक्टोंबर, २०२२ अखेर दाखल गुन्ह्यांचा तपशील पुढीलप्रमाणे:-

| प्रकार | दाखल गुन्हे |
|---|---|
| घरफोडी | ३ |
| वाहन चोरी | २६ |
| मोबाईल चोरी | ३ |

पर्सचोरी याअंतर्गत एकही गुन्हा घडलेला नाही.

गत वर्षीच्या तुलनेत घरफोडीच्या गुन्ह्यात दोन ने वाढ झाली आहे तथापि, मोटार वाहन व मोबाईल चोरीच्या घटनेत घट झालेली आहे.

(३) भोकदन शहरात अवैध धंदे रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

अ) हद्दीतील गस्ती व नाकाबंदीचे प्रमाण वाढविण्यात आले आहे.

ब) गुन्ह्याचे प्रवणक्षेत्र, गुन्ह्याची वेळ, गुन्हा करण्याची पध्दत यांचे विश्लेषण करुन प्रतिबंधात्मक उपाय करण्यात येत आहे.

क)नागरीकांनी सतर्क राहुन संशयास्पद हालचाली निदर्शनसास आल्यास, पोलीसांना कळविण्यासबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

क) गुन्हे प्रवणक्षेत्रामध्ये ई-बीट पेट्रोलींग ची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

ड) पोलीस स्टेशन स्तरावर एक पोलीस उपनिरिक्षक दर्जाचे अधिकारी व चार पोलीस अंमलदार यांचे एक विशेष पथक कार्यान्वित करण्यात आले आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## बाळगंगा (ता.पेण, जि.रायगड) प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३२) ४७६४५ (१४-१०-२०२२). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळगंगा (ता.पेण, जि.रायगड) येथे सन २०१०-२०११ मध्ये सुरु करण्यात आलेल्या प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करुनही त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी रु. ५१६.१७ कोटी रकमेच्या पुनर्वसन आराखडयास महाराष्ट्र प्रकल्पबाधीत व्यक्तींचे अधिनियम १९९९ अन्वये प्राधिकरणाच्या दि. ०४/०५/२०११ रोजीच्या १२ व्या बैठकीस मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पबाधीतांचे पुनर्वसन ५ खाजगी जमीनीत व २ शासकीय जमीनीत प्रस्तावित असून पुनर्वसनासाठीच्या खाजगी जमीनीस एकूण ५ निवाडे सन २०१५ मध्ये महसूल विभागामार्फत जाहीर करण्यात आले असून संपूर्ण मोबदला रक्कम महसूल विभागाकडे वर्ग करण्यात आली असून देखील अद्यापपर्यंत संपादीत केलेल्या शेतकऱ्यांचे पुनवर्सन करण्यात आले नसून त्यांना मोबदला देखील देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने जमिनी संपादति केलेल्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन तात्काळ तसेच त्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय.

महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधिकरणाच्या दिनांक ०४/०५/२०११ रोजीच्या बोर्डाच्या १२ व्या बैठकीत बाळगंगा धरण प्रकल्पाचे फक्त पुनर्वसन आराखडयास मंजुरी देणेच्या दृष्टीने रू.२१७.५७ कोटी रकमेच्या प्रस्तावास शासनाची मंजूरी घेण्यासाठी सादर करणेबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. त्यानुसार सदर रू.२१७.५७ कोटी व भूसंपादनाकरिता रु. २९९.१३ कोटी अशी एकूण रु. ५१६.७० कोटी रक्कम पुनर्वसन व भूसंपादनाकरिता प्रस्तावित होती.
बाळगंगा प्रकल्पामुळे बाधीत होणा-या कुटूंबासाठी रु.४२४.८१ कोटीचा सुधारीत पुनर्वसन आराखडा विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कडून दि.१७/०५/२०२२ रोजी प्रधान सचिव, मदत व पुनर्वसन विभाग यांना मंजूरीसाठी सादर करण्यात आला असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
(२) अंशतः खरे आहे.

भूसंपादनापोटी महसूल विभागास एकूण रू. ५९९.९३ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला असून निवाड्याप्रमाणे अंदाजे ७६ टक्के मोबदला रक्कमेचे वाटप झालेले आहे. तसेच, पुनर्वसन गावठाणाकरीता आवश्यक क्षेत्राचा भुसंपादन प्रस्ताव रायगड पाटबंधारे विभाग क्र. २ या कार्यालयाच्या दि.१४.१०.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी रायगड-अलिबाग यांना सादर करण्यात आलेला आहे.
(३) मोजे गागोदे बुद्रुक,गागोदे खुर्द,निधवली,आंबेघर व वरसई या ५ गावातील भुसंपादन करण्यात आले असून प्रकल्पग्रस्तांना ८३ कोटी ४५ लक्ष इतक्या निवाडा रक्कमेपैकी ७६ कोटी २४ लक्ष इतका मोबदला वाटप केला असून उर्वरित प्रकल्पग्रस्तांना मोबदला देण्याची कार्यवाही महसूल विभागामार्फत प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केज (जि. बीड) मतदार संघात १३२/३३ व २२०/३३ केंद्रा मधून सुरळीत विद्युत पुरवठ्यासाठी विविध कामे करण्याबाबत

**(३३) ४७६४६ (१६-०८-२०२२). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, जि. बीड. मतदार संघातील १३२/३३ व २२०/३३ केंद्रातून सुरळीत विद्युत पुरवठा होण्याकरिता व योग्य दाबाने व्होल्टेज मिळण्याकरिता गवारी (मांजरसुभा) (ता. जि. बीड) येथील २२०/३३ केंद्रामध्ये ५० चे ट्रान्सफॉर्मर बसवण्याबाबत तसेच १३२/३३, कळंब (जि. उस्मानाबाद) या केंद्रावर केज मतदार संघातील माळेगाव, युसुफवडगाव, धनेगाव, बनसारोळा, आपेगाव, अशी पाच ३३ केव्ही उपकेंद्र एकाच लाईनवर आहे त्यामुळे योग्य दाबाने विद्युत पुरवठा होत नसल्याने पाथ्रा (ता. केज, जि. बीड) येथे १३२ केव्ही उपकेंद्र मंजूर करावे किंवा येडेश्वरी साखर कारखाना (ता. केज, जि.बीड) येथील ३३ केव्ही उपकेंद्राचा विस्तार करून सदर ठिकाणी १३२/३३ चा ट्रान्सफार्मर बसविण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी ऊर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) स्थानिक लोक प्रतिनिधी यांनी प्रधान सचिव (ऊर्जा) व कार्यकारी संचालक, महापारेषण यांना दि.१५.६.२०२२ च्या पत्रान्वये विनंती केली आहे.
(२) गवारी (मांजरसुंबा) ता. जि. बीड येथील २२०/३३ के.व्ही.उपकेंद्रावरील भार कमी व्हावा व वीज ग्राहकांना योग्य दाबाने गुणवत्तापूर्वक वीज पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी २२ किमी अंतरावर नवीन १३२/३३ के.व्ही. ५० एमव्हीए क्षमतेचे उपकेंद्र सारुळ येथे उभारण्याचा तांत्रिक प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया पुर्ण करुन महापारेषण कंपनीस पत्र क्र. १६८१९, दि.२४.०६.२०२२ अन्वये सादर करण्यात आला आहे. मांजरसुंबा उपकेंद्रांतुन सद्यस्थितीत निर्गमित होणाऱ्या ३३ के.व्ही. येळंबघाट वाहिनीवरील दोन उपकेंद्रे ३३/११ के.व्ही. नांदुरघाट उपकेंद्र (५ एमव्हीए), वाघेबाभळगांव उपकेंद्र (५ एमव्हीए) प्रस्तावित सारुळ उपकेंद्रातून नवीन ३३ के.व्ही. वाहिनी उभारुन त्यावर स्थलातरीत करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे मांजरसुंभा उपकेंद्रावरील उच्चतम भार कमी होऊन स्थापित क्षमतेच्या सदर वाहिनी कार्यान्वित झाल्यानंतर युसुफवडगांव वीज वाहिनीवरील वीज भार विभाजित होऊन सर्व उपकेंद्रांना योग्य दाबाने गुणवत्तापूर्वक वीज पुरवठा करणे शक्य होणार आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि. जळगांव) तालुक्यातील मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोंधनखेडा, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा या गावांचा आदिवासी गावांमध्ये समावेश करण्याबाबत

**(३४) ४७६८० (१४-१०-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि. जळगांव) तालुक्यातील मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोंधनखेडा, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा ही गावे स्वातंत्र्यपूर्व काळापासून वसलेली असून शासकीय अभिलेखातील चुकीमुळे किंवा तांत्रिक अडचणीमुळे सदरहू गावांमध्ये १०० टक्के आदिवासी नागरीक असतांनाही उक्त गावांना आदिवासी बाहय गावे अशी नोंद करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे सदरहू गावांना आदिवासीसाठी असलेल्या विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याने उक्त गावांचा समावेश आदिवासी गावे म्हणून करण्याची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी आदिवासी विकास विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुक्ताईनगर (जि. जळगांव) तालुक्यातील मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोंधनखेडा, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा या गावांचा आदिवासी गावांमध्ये समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, या संदर्भात मा.लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दि.१२/०७/२०२१ रोजीच्या निवेदनाद्वारा मागणी केलेली आहे.
(३) मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि.२ डिसेंबर १९८५ रोजी अधिसूचना काढण्यात आलेली आहे. सदर अधिसूचना काढून ३७ वर्षाचा कालावधी झालेला आहे.त्यामुळे सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राची पुर्नरचना करणे आवश्यक आहे. अनुसूचित क्षेत्रात गावांचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने काही निकष निश्चित केले आहेत.
महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेच्या अनुषंगाने दि.२३/११/२०२२ रोजी मा.मंत्री,आदिवासी विकास यांच्याकडे बैठक आयोजित करण्यात आली होती.
सदर बैठकितील चर्चेनुसार व केंद्र शासनाच्या निकषांनुसार आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्यामार्फत राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यात पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या निवासस्थानांचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(३५) ४७७१३ (३१-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात व पोलिस मुख्यालय परिसर येथील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या १,९०९ निवासस्थानांचे सन २०१६ या कालावधीत पाठविलेले प्रस्ताव पोलिस गृहनिर्माण महामंडळाकडे प्रलंबित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव अद्यापही प्रलंबित असल्याने यावर शासनाची भूमिका काय व याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :**(१) व (२) पोलीस अधीक्षक कार्यालय सांगली यांचेकडून सांगली जिल्हयातील एकुण १८ पोलीस ठाणे कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे करीता १९०९ निवासस्थाने बांधकाम करणे बाबतचे प्रस्ताव माहे ऑगस्ट २०१६ मध्ये सादर करण्यात आले असून, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाकडून सदर प्रस्तावाचे अनुषंगाने १८ पोलीस ठाणे कडील निवासस्थाने बांधकामाकरीता प्रकल्प व्यवस्थापक म्हणून वास्तूविशारद यांची नियुक्ती केली असून, त्यांनी प्रकल्पाचे बांधकाम आराखडे पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडे सादर केले आहे.

राज्यातील पोलीस सेवा निवासस्थान प्रकल्पाच्या बांधकामास प्राधान्यक्रम व निकष ठरविण्याची कार्यवाही सुरु असून प्राधान्यक्रम व निधीच्या उपलब्धते नुसार बांधकाम करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सन २०१९ साली कृष्णा-वारणा-पंचगंगा नद्यांना महापूर आल्यानंतर महापूराचे नियंत्रण व उपाययोजना कायमस्वरुपी करण्याबाबत

**(३६) ४७७१४ (११-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ साली कृष्णा-वारणा-पंचगंगा नद्यांना महापूर आल्यानंतर महापूराचे कायमस्वरुपी नियंत्रण करण्याकरिता वेगवेगळया तज्ञांच्या चर्चेतून केलेल्या अनेक उपाययोजना यंदाचा पावसाळा तोंडावर आल्यानंतरही कागदावरच असल्याची बाब माहे जून, २०२२ रोजीच्या सुमारास निदर्शनास आली आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणकोणत्या उपाययोजना सूचविण्यात आल्या होत्या, तसेच उक्त उपाय योजनांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

शासन जलसंपदा विभागाने दि.१२.१०.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार कृष्णा पूर अभ्यास समितीने (वडनेरे समिती) दि.२७ मे, २०२० रोजी सादर केलेल्या अहवालातील १८ शिफारशी पैकी १० स्वीकृत, ५ अंशत: स्वीकृत, १ सुधारणेसह स्वीकृत व २ अस्वीकृत केल्या आहेत. या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) पूर अभ्यास समितीच्या अहवालात जलाशय परिचालन सुधारीत करणे व एकात्मिक पध्दतीने करणे, पूर पूर्वानुमान प्रणाली अद्यावत करून कर्नाटकातील अलमट्टी व नारायणपूर पर्यंत त्याचा विस्तार करणे, मुख्य नदीच्या लांबीतील सर्व भागात पूररेषा आखणी करणे, नदी व मोठे नाले रूंदीकरण करणे, खोलीकरण करणे व त्यातील गाळ काढणे इत्यादी उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत.

(३) पूर नियंत्रणासाठी पूर अभ्यास समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार पूरविषयक उपाययोजनांच्या कामासाठी जागतीक बँक व आशियाई विकास बँक यांचेकडून अर्थसहाय्य मिळणेबाबत कार्यवाही प्रगतीत आहे.

---

### सांगली जिल्हयात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याबाबत

**(३७) ४७७५४ (१४-१०-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याचा प्रकार होत असल्याचे माहे एप्रिल,२०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वारंवार होणा-या वीज पुरवठा खंडित होत असल्याने शेतीसाठी पाणी मिळत नसल्याने पिकाचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज पुरवठा अखंडित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-१२-२०२२) :** (१), (२) व (३)

सांगली जिल्ह्यात दिनांक ०४ ते ११ एप्रिल व २३, २४ एप्रिल, २०२२ रोजी वादळ, वारे व पाऊस या नैसर्गिक आपत्तीमुळे वीज पुरवठा खंडित झालेला होता. या कारणामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याची तक्रार महावितरण कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तसेच इतर काही तांत्रिक कारणामुळे उच्चदाब/ लघुदाब वाहिनी तुटणे, रोहित्र बिघाड इ.मुळे वीज पुरवठा खंडित झाला होता.

(४) वादळी वारे व पाऊस या नैसर्गिक आपत्ती तसेच इतर तांत्रिक कारणास्तव वीज वाहिनीवर बिघाड झाल्यानंतर तात्काळ पाहणी करुन व योग्य ती दुरुस्ती करुन त्या त्या वेळेस वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. तसेच त्यानंतर देखील वारंवार वीज वाहिन्यांची प्रतिबंधात्मक देखभाल व दुरुस्ती जसे वाढीव फांद्यांची काटछाट करणे, तारांचा झोळ कमी करणे इत्यादी कामे करुन वीज पुरवठा कमी खंडित होईल याची खबरदारी घेण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मलकापूर (जि.बुलडाणा) येथे शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन प्रशासकीय इमारत तसेच अधिकारी शासकीय निवासस्थाने व कर्मचारी रहिवासीकरीता बॅरेक बांधण्याबाबत

**(३८) ४७७७४ (३०-१०-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर (जि.बुलडाणा) येथे पोलीस स्टेशन मलकापूर शहर व ग्रामीण येथील प्रशासकीय इमारत व शासकीय निवासस्थान बांधकाम पूर्णपणे शिकस्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच पोलिस दलात सतत वाढ होत असल्यामुळे मलकापूर शहर व ग्रामीण पोलीस अधिकारी व कर्मचारी निवासस्थान मंजूर संख्या १०० च्या ७० टक्के प्रमाणे शासकीय निवासस्थान तसेच प्रशासकीय इमारत व बॅरेक बांधकाम करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाचे स्वरुप काय आहे व निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०१-२०२३) :**(१), (२) व (३) होय.

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर शहर प ग्रामिण येथील अधिकारी / कर्मचारी यांच्या मंजूर संख्याबळाच्या ७०% प्रमाणे शासकीय निवासस्थान व प्रशासकीय इमारत, तसेच बॅरेक बांधकाम करणेची मागणी केली आहे. पोलीस ठाणे, मलकापूर शहर प्रशासकीय इमारत आणि मलकापूर ग्रामीण व शहर येथील निवासस्थाने या बांधकामास प्राधान्यक्रम ठरविण्याची कार्यवाही सुरु असून निधीच्या उपलब्धतेनुसार पुढील कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील मौजे माळूब्रा व आशिव उपकेंद्राचे काम निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३९) ४७८१७ (२०-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बेलकुंड (ता.औसा, जि.लातूर) येथील उपकेंद्रावर विदयुत भार जास्तीचा असल्याने अनेक गावातील शेती पंपाचा वीज पुरवठा हा एक दिवसाआड बंद ठेवण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपकेंद्र परिसरात मंजूर असलेल्या माळूब्रा उपकेंद्रासाठी जमीन संपादन करून माळुब्रा व आशिव (ता.औसा) येथील मंजूर उपकेंद्राच्या कामासाठी आवशक निधीची तरतूद करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे सन २०२१ मध्ये निवेदनाद्वारे तसेच पालकमंत्री यांच्याकडे जिल्हास्तरीय बैठकीत सातत्याने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना योग्य दाबाने व सुरळीत वीज पुरवठा देण्यासाठी सदरील उपकेंद्राचे कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदरील कामासाठी किती निधीची आवशकता असून निधीची तरतूद करून प्रत्यक्षात कामे सुरु करण्यासाठी शासनास आणखी किती कालावधी लागणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

(२) होय हे अंशत: खरे आहे.

लोकप्रतिनिधींचे दिनांक १३.०७.२०२२ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे.

(३) भविष्यात औसा तालुक्यातील वीज ग्राहकांना योग्य दाबाने गुणवत्तापूर्वक अखंडित वीज पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी मौजे अशिव, ता. औसा येथे सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत (RDSS) नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच नविन ३३/११ के.व्ही. माळुम्ब्रा उपकेंद्र उभारणीच्या प्रस्तावास कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० योजने अंतर्गत तांत्रिक मंजूरी दि. १६.११.२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आली असून क्षेत्रिय कार्यालय स्तरावर निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जिल्हा कृ षी आकस्मिक निधीच्या उपलब्धतेनुसार सदर उपकेंद्राचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येईल.

(४) मौजे आशिव येथे नवीन ३३/११ के.व्ही. (१x५) एमव्हीए उपकेंद्रासाठी अंदाजित खर्च रु. २.८४ कोटी एवढा (RDSS) योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच मौजे माळुम्ब्रा येथे नवीन ३३/११ के. व्ही. (१x५) एमव्हीए उपकेंद्रासाठी अंदाजित खर्च रु.३.९४ कोटी एवढा कृषी धोरण २०२० योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात आला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर उपकेंद्रांची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदुरा नगर परिषदेच्या हद्दीतील आदिवासी घरकुल योजनेस पात्र असणा-या नागरीकांना घरकुल मंजुर करण्याबाबत

**(४०) ४७९३३ (२२-०९-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमांत्री आवास योजनेच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागाच्या दि.१५.०३.२०१६च्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेची अमलबजावणी ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कडुन करण्यात येत आहे. त्याच धर्तीवर शहरी भागातील घरकुल कार्यक्रमाची अमलबजावणी गृहनिर्माण विभागाच्या अधिनस्त म्हाडामार्फत करण्याच्या अनुषांगाने सादर केलेल्या नस्तीवर गृहनिर्माण विभागाचा अभिप्राय आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अभिप्रायाप्रमाणे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, गृह निर्माण विभागाचाअभिप्राय लवकरात लवकर प्राप्त करण्याबाबत आदिवासी विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. विजयकुमार गावीत (२२-१२-२०२२) :** (१),(२) व ३), मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा यांनी “शबरी घरकूल योजनेसाठी म्हाडा प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात येऊ नये” या दिलेल्या अभिप्रायाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा यांचेकडून कारणमिमांसेसह सविस्तर अहवाल गृहनिर्माण विभागाद्वारा मागविण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मायक्रो फायनांन्स कंपन्यांकडून सक्तीने कर्ज वसूली सुरु असल्याबाबत

**(४१) ४८०१३ (२८-१०-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये मायक्रो फायनांन्स कंपन्यांकडून सक्तीने कर्ज वसूली करीत असल्याबाबतच्या तक्रारी वाढल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज वसूलीसाठी बेकायदेशीर कार्यपध्दतीचा वापर झाल्याबाबत जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक, कोल्हापूर यांच्याकडे तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाच्या तक्रारींबाबत लोक्रप्रतिनीधी यांनी माहे मार्च अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने तत्कालीन गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षेतखाली दिनांक २५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास संपन्न झालेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेल्या निर्देशानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :** (१) व (२) मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्जवसुलीसाठी बेकायदेशीर कार्यपध्दतीचा वापर होत असल्याबाबत तसेच सक्तीने कर्ज वसूली सुरु असल्याबाबत पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांचेकडे तक्रार प्राप्त नाही.

(३) सदर विषयाच्या अनुषंगाने तत्कालीन राज्यमंत्री (गृह-ग्रामीण) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०.०५.२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेनूसार जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी यांना त्याच्या कार्यक्षेत्रात मायक्रो फायनान्स कंपनीकडून सक्तीने कर्जवसुलीबाबत तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ गुन्हा नोंद करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

---

## महाराष्ट्र राज्यातील जिल्हा पातळीवरील सर्व न्यायालयांचे कामकाज मराठी भाषेत चालविण्याकरिता कायदा मंजूर करुन अमंलबजावणी होणेबाबत

**(४२) ४८११६ (२०-०९-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने न्यायालयाचे कामकाज पूर्णपणे मराठी भाषेत चालावे याकरिता सन १९९८ मध्ये कायदा मंजूर करुनही अद्याप त्याची अमंलबजावणी झाली नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री.अभय ओक यांनी दि.१५ एप्रिल,२०२२ रोजी राज्य शासनाच्या निदर्शनास आणून दिली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एकूण जिल्ह्यापैकी किती जिल्ह्यामध्ये जिल्हा न्यायालयाचे कामकाज मराठी भाषेत झाले व किती जिल्हामध्ये माहे जून, २०२२ पर्यत बाकी असल्याचे निदर्शानास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त अधिनियम मंजूर करुन त्यास २४ वर्षे इतका कालावधी होवुनही अद्यापपर्यत न्यायालयाचे कामकाज मराठीतून झाली नसल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, राज्य सरकारने जिल्हा पातळीवरील सर्व न्यायालयाचे कामकाज मराठी भाषेत चालविण्याबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-१२-२०२२) :** (१) व (२) नाही.सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा.श्री. अभय ओक यांच्याकडून कोणत्याही स्वरुपात ( आदेश , सूचना ) शासनास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि , मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या दि.१५.१०.२०२२ च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, शासनाच्या दि. २९.०७.१९९८च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने उच्च न्यायालयाव्यतिरिक्त राज्यातील सर्व न्यायालयांची भाषा मराठी करण्याचे मा. उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व दुय्यम न्यायालयांना त्यांच्या दि.९.१२.२००५ च्या परिपत्रकान्वये निर्देशित केलेले आहे. त्याप्रमाणे सर्व जिल्हा न्यायालये सदर निर्देशांचे पालन करत असून न्यायालयीन कामकाजात मराठी भाषेचा वापर करण्यात येत आहे.

(३) लागू नाही.

(४) जिल्हा न्यायालयांचे सर्व नियंत्रण हे उच्च न्यायालयाच्या अधिपत्याखाली येत असून त्यामध्ये शासनाकडून हस्तक्षेप करण्यात येत नाही.

(५) लागू नाही.

---

## राज्यातील मंत्र्यांच्या नावाचा वापर करुन एका महिलेची केलेली आर्थिक फसवणूक

**(४३) ४८१६८ (०१-११-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे तत्कालिन गृह (शहरे), राज्यमंत्री यांच्या नावाचा वापर करुन एका महिलेची सुमारे १० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार नवी मुंबईतील कामोठे येथे दिनांक १७ व १८ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाच्या तक्रारीचे स्वरुप काय आहे, तक्रारीनुसार तपास करुन किती व्यक्तींना अटक करण्यात आली वा त्यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०१-२०२३) :**(१),(२) व (३) होय.

राज्याचे तत्कालिन राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचेशी ओळख असून फिर्यादी यांना व्यवसायाकरीता गुंतवणूकदार देतो

असे सांगून फिर्यादीकडून वेगवेगळया प्रकारे रक्कम घेऊन त्यांना व्यवसायाकरीता गुंतवणूकदार न देता तसेच त्यांचे पैसे परत न करता राज्यमंत्री, गृह (शहरे) यांच्या नावाचा वापर करुन एका महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस आयुक्त, नवी मुंबई अंतर्गत कामोठे पोलीस ठाणे येथे गुरनं. क्र.१४१/२०२२, भादंवि कलम ४२० अन्वये दिनांक १७.०६.२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्वी तालुक्यातील निम्न वर्धा प्रकल्पातून अतिरिक्त सोडलेल्या पाण्यामुळे वर्धा नदी काठावरील नुकसानग्रस्त शेतजमिनींचे शासनाकडून संपादन करण्याबाबत**

**(४४) ४८२२३ (१०-११-२०२२). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी तालुक्यातील निम्न वर्धा प्रकल्पामध्ये १००% क्षमतेने पाणी साठवण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पातील पावसाळयामध्ये अतिरीक्त पाणी वर्धा नदी मध्ये सोडण्यात येत असल्याने अतिरिक्त पाण्यामुळे वर्धा नदी काठावरील मौजा रोहणा, मौजा हद्यापूर व मौजा सायखेडा येथील शेतकऱ्यांच्या जमीनीमध्ये पाणी जावून शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१२ पासून सातत्याने हा प्रकार होत असून सदरहू भागातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, शासन त्यांना तुटपुंजी मदत देवून समाधान करते, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, सदर भागातील शेतकऱ्यांचे दरवर्षी होणारे नुकसान टाळण्याकरीता नदी काठावरील शेतकऱ्यांच्या जमिनी शासन संपादीत करण्याबाबतची मागणी होत असल्याने या संदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०१-२०२३) :** (१) होय, सन २०१९ पासून धरणात १०० टक्के क्षमतेने पाणी साठवण करण्यात येत आहे.
(२) सदर प्रकल्पाच्या धरणातून नदीपात्रात पाणी सोडल्यामुळे शेतकऱ्याचे पीकाचे नुकसान होत नसून अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे.
(३) अतिवृष्टीमुळे नुकसान भरपाई ही बाब महसूल विभागाशी संबंधित आहे.
(४) जमीन संपादनाची आवश्यकता नाही. प्रकल्पांतर्गत अशा प्रकारची तरतूद नाही.
(५) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अपारंपारीक उर्जा धोरण, २०२० ची अंमलबजावणी ३१ मार्च, २०२७ पर्यंत करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतल्याबाबत**

**(४५) ४८२५१ (२०-०९-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अपारंपारीक उर्जा धोरण, २०२० ची अंमलबजावणी ३१ मार्च, २०२७ पर्यंत करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निर्णयामुळे अपारंपारीक उर्जा क्षेत्रात किती प्रकल्प सुरु करण्याचे उद्दीष्ट आहे व यामुळे राज्याची किती उर्जेची मागणी कमी होणार आहे,
(३) असल्यास, अद्याप उक्त निर्णयाच्या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही सुरु झाली नसल्यास, किती कालावधी यासाठी लागणे अपेक्षित आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-११-२०२२) :** (१) होय. शासन निर्णय दिनांक ३० जुन, २०२२ अन्वये अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० च्या अंमलबजावणीचा कालावधी दिनांक ३१ मार्च, २०२७ पर्यंत करण्यात आला आहे.
(२) राज्यातील वाढते औद्योगिकरण व शहरीकरण पारंपारिक ऊर्जेची मर्यादित संसाधने, केंद्र शासनाचे अपारंपारिक ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट व अपारंपारिक ऊर्जा खरेदी बंधन या बाबी विचारात घेऊन पुढील ५ वर्षात वीजेची वाढीव मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने दिनांक ३१ डिसेंबर, २०२० च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आलेल्या राज्याचे नवीन अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत एकूण १७३६० मेगावॅट इतकी वीज क्षमतावृध्दी पर्यावरण पूरक अशा नवीन अपारंपारिक ऊर्जा निर्मिती प्रकल्प आस्थापित करण्याचे उद्दिष्ट आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-
१ पवन ऊर्जा प्रकल्प - २५०० मेगावॅट
२ सौर ऊर्जा प्रकल्प -१२९३० मेगावॅट
३ उसाच्या चिपाडावर/ कृषि अवशेषांवर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प - १३५० मेगावॅट
४ लघुजल विद्युत निर्मिती प्रकल्प - ३५० मेगावॅट
५ शहरी घनकचऱ्यावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प - २०० मेगावॅट
सदर प्रकल्प सूरू केल्यानंतर राज्यातील सुमारे ३२५४२ दशलक्ष युनिटस प्रतिवर्षी पारंपारिक ऊर्जेची मागणी कमी होणे अपेक्षित आहे.
(३) अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० ची अंमलबजावणी सुरू आहे. अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण- २०२० अंतर्गत आतापर्यंत ५५.८ मेगावॅट क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प, ९२२.८७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प,१५२.९ मेगावॅट क्षमतेचे सहवीज निर्मिती प्रकल्प व ०.५ मेगावॅट क्षमतेचा लघुजल निर्मिती प्रकल्पांची नोंदणी करण्यात आली आहे. त्यापैकी ५४८.३६ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प- कार्यान्वित करण्यात आले आहेत.

---

**मनमाड शहरातील पोलीस स्थानकाचे नुतनीकरण करुन सुसज्ज सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४६) ४८२५६ (३०-१०-२०२२). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मनमाड (जि.नाशिक) शहरातील पोलीस स्थानके ब्रिटिशकालीन असून त्यांचे अद्यापही नुतनीकरण करण्यात न आल्यामुळे पोलीस स्थानकांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू स्थानकात कुठलीही सुविधा नसल्याने पोलीस कर्मचारी व नागरीकांची मोठी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०१-२०२३) :** (१), (२) व (३) होय.
पोलीस अधिक्षक, नाशिक ग्रामीण आस्थापनेवरील मनमाड पोलीस ठाणे इमारतीचे बांधकाम जुने व जिर्ण झाले असून सदर इमारत दैनंदिन कामकाज करण्याचे दृष्टीने अपुरी आहे.
पोलीस स्टेशन, मनमाड येथे प्रशासकीय इमारत बांधकाम करणेकरिता सन २०२२-२३ या वर्षातील सूचीनुसार अंदाजपत्रकासह प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयास प्राप्त झाल्यावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली तालुक्यातील वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेला प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(४७) ४८४६६ (१२-१०-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीवर गडचिरोली तालुक्यात वसा गावाजवळ वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तालुक्यात कोटगल गावाजवळ वैनगंगा नदीवर कोटगल ब्यारेज या मोठ्या सिंचन प्रकल्पाचे काम सुरु असून सदर सिंचन प्रकल्पांतर्गत वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेची मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कोटगल ब्यारेजचे काम पूर्ण होण्याआधी वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेचे काम होणे आवश्यक आहे तसेच सदर तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली येवून त्याचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने शासनाने वसा पोर्ला उपसा सिंचन योजनेला प्रशासकीय मान्यता देवून निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय.

(२) होय.

सदर योजना कोटगल बॅरेजच्या पाणी पसाऱ्यातुन प्रस्तावित असून योजनेची सिंचन क्षमता ४२५० हे. आहे.

(३) होय.

सदर योजनेअंतर्गत ९ गावातील एकूण ४२५० हे. क्षेत्रास सिंचनचा लाभ होणार आहे.

(४) सदर योजनेमुळे गडचिरोली तालुक्यातील ९ गावातील एकूण ४२५० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. पोर्ला-वसा उपसा सिंचन योजनेचे संकल्पन मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांचेकडून अंतिम करून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल. त्याअनुषंगाने सर्वसाधारण आराखडा (संकल्पन) मंजूरी करीता क्षेत्रीय आधार सामग्री, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना (उसिंयो), नाशिक यांना क्षेत्रीय स्तरावरून सादर करण्यात आला असुन सर्वसाधारण आराखडा मंजूरीची कार्यवाही सुरु आहे.

सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर व त्यानुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर प्रकल्पास निधी वितरण करण्याबाबतची कार्यवाही करणे शक्य आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भिवंडी शहरात विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत

**(४८) ४८५४८ (३०-१०-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी हे अतिसंवेदनशील शहर असून वाढती लोकसंख्या व गुन्हेगारीचे प्रमाण देखील वाढत आहे तसेच पावरलूम व्यवसाय मोठ्या प्रमाणावर असून त्यांच्याशी निगडीत उद्योगधंदे, विविध कंपन्यांचे गोडाऊन देखील भिवंडीत मोठ्या प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शहरात शांतता व सुव्यवस्था राखणेकामी, गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याकरिता सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची नितांत आवश्यकता असल्याने संपूर्ण भिवंडी शहरात ५३० ठिकाणी १३१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत यापूर्वी सर्वे करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे कामे निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २१ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०१-२०२३) :**(१) व (२) पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.२९.१०.२०२१ च्या पत्रान्वये ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १, २, ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) सादर केला आहे. सदरच्या प्रस्तावात भिवंडी निजामपुरा शहराचा समावेश असून सदर शहरात ५४० ठिकाणी एकूण १३१२ सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे प्रस्तावित आहे.
(३) व (४) ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ १, २, ४ व ५ या विभागात सीसीटीव्ही यंत्रणा उभारण्याबाबत सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR) तांत्रिक मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव माहिती व तंत्रज्ञान विभागास पाठविण्यात आला होता. माहिती व तंत्रज्ञान विभागाने DPR मधील तांत्रिक बाबींची तपासणी करुन अभिप्राय दिले असून अभिप्रायानुसार सुधारणा करुन प्रस्ताव पुन्हा शासनास पाठविण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## किनवट (जि.नांदेड) येथे अवैध व्यवसायाच्या माध्यमातून मोठमोठ्या टोळ्या तयार करण्याचे कारस्थान सुरु असल्याबाबत

**(४९) ४८६४७ (०१-११-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किनवट (जि.नांदेड) येथे अवैध व्यवसायाच्या माध्यमातून मोठमोठ्या टोळ्या तयार करण्याचे कारस्थान सुरु असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात अवैध रेती उत्खनन, अवैध मटका संचलन, पत्त्याचा डाव चालविणारे अशा वेगवेगळ्या गैरकारभारांतील टोळी असून संबंधित पोलीस प्रशासन तसेच राजकीय पाठबळ असल्याने या टोळीमध्ये भविष्यात मोठे तंटे होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो हे लक्षात घेता शासन त्वरीत याबाबत चौकशी करुन कोणती आवश्यक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :**(१) हे खरे नाही.
(२) किनवट पोलीस स्टेशन, जिल्हा नांदेड यांच्या हद्दीमध्ये अवैध रेतीचे उत्खननाचे प्रकरण आढळून आले नाही. परंतु माहे जानेवारी २०२२ ते ऑक्टोबर २०२२ या कालावधीमध्ये अवैध मटका, जुगार तसेच अवैध दारु विक्री, विना परवाना दारु बाळगणे अशा प्रकरणांमध्ये एकूण ८१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर गुन्ह्यांतील एकूण ९५ आरोपींविरुध्द कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून एकूण रुपये ९,८३,८४२/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

किनवट पोलीस स्टेशन, जिल्हा नांदेड हद्दीमध्ये अवैध धंदे सुरु असल्याची माहिती मिळताच तातडीने कारवाई करण्यात येत असून अशा प्रकारच्या कोणत्याही अवैध धंद्यांना पोलीस प्रशासन अथवा राजकिय पाठबळ देण्यात आलेले नाही.

किनवट पोलीस स्टेशन, जिल्हा नांदेड हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत प्रश्न निर्माण करणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द वेळोवेळी कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधी समर्पित करावा लागल्याबाबत

**(५०) ४८८९२ (२०-०९-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर अंतर्गत सन २०१९-२० मध्ये अनुसूचित जमातीतील लोकांसाठी केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना गट-अ अंतर्गत मंजूर निर्धारित लक्षांक १७५ असतांना त्यापैकी १५२ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असून उर्वरित २३ लाभार्थी लाभापासून वंचित राहिले असतांनाही ९ लाभार्थीना लाभ देण्याची कार्यवाही सुरु असून उर्वरीत १४ लाभार्थी लाभा पासून वंचित असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२० करिता नागपूर कार्यालयांस वितरित केलेल्या रुपये ७८,४६,०००/- निधीपैकी रुपये ३५,५२,२६६/- इतका निधी वैयक्तिक लाभाच्या योजनांवर खर्च करण्यांत येवून सामुहिक लाभाच्या योजना कोरोना काळामुळे राबविणे शक्य न झाल्यामुळे रु. ३३,४७,८००/- इतका निधी शासनास समर्पित करण्यांत आला असून रुपये ४२,९३,७३४/- इतका निधी शिल्लक राहत असतांना रु. ३३,४७,८००/- निधी समर्पित केल्यामुळे अधिकचा उर्वरित रु. ०९,४३,९३४/- इतका शिल्लक निधीचा वापर कोणत्या कामासाठी केला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२३-०१-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत सन २०१९-२० मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना गट अ करिता १७५ लक्षांक ठरविण्यात आलेला होता. त्यापैकी १५५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरित २० लाभार्थ्यांपैकी १७ लाभार्थ्यांना वारंवार संपर्क करुनदेखील त्यांचेकडून प्रतिसाद मिळालेला नाही. तर, ३ लाभार्थ्यांची आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता झालेली नसल्यामुळे योजनेचा लाभ देता येणे शक्य झालेले नाही.

(२), (३) व (४) केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेअंतर्गत नागपूर कार्यालयास सन २०१९-२० करिता अट अ, ब व क करिता अनुक्रमे रु. ४३,०१,०००/-, रु. २१,५०,०००/- व रु. १३,९५,०००/- असा एकूण रु. ७८,४६,०००/- निधी प्राप्त होता. त्यापैकी गट अ च्या योजनेकरिता रु. ३२,६६,८२३/- इतका खर्च झालेला आहे. तर गट ब मधील प्रशिक्षणाच्या योजना कोरोना प्रादुर्भावामुळे राबविण्यात आलेल्या नाहीत. मात्र, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना MHT-CET (Engg & Medical)/NEET/JE (Main & Advance ) दोन वर्षाचे प्रशिक्षण देणे या योजनेचे दुसऱ्या वर्षाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने देण्यात आलेले आहे. याकरिता संबंधित संस्थेस रु. ५,६०,०००/- इतके देयक अदा करण्यात आलेले आहे. तर, गट क अंतर्गत मंजूर ७ योजनांपैकी ४ योजना राबविण्यात आलेल्या असून त्याकरिता रु. ४,०५,४४३/- इतका निधी खर्च झालेला आहे. सबब, मंजूर निधीपैकी अखर्चित रु. ३६,१३,७३४/- इतका निधी शासन खाती जमा करण्यात आलेला आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.